FIRST INFORMATION REPORT                                    **Form : 1-A**

पहिली खबर

(Under Section 154 Cr. P.C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

No. 0045167

1. *Dist. जिल्हा गडचिरोली *P.S. पोलीस ठाणे आरमोरी *Year वर्ष 2021 *FIR No. पहिली खबर क्र. 287/2021 *Date तारीख 17/09/2021

2. (i) *Act अधिनियम भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. *Sections कलमे 7

(ii) *Act अधिनियम सन 1988 संशोधन 2018 *Sections कलमे —

(iii) *Act अधिनियम — *Sections कलमे —

(iv) *Other Acts & Sections इतर अधिनियम व कलमे —

3.(a) *Occurence of Offence : अपराधाची घटना *Day वार शुक्रवार *Date from तारीख पासून 17/09/2021 *Date To तारीख पर्यंत 17/09/2021

*Time Period वेळेचा अवधी दिड तास *Time From पासून 16/18 *Time To पर्यंत 17/45

(b) Information received at P.S.Date पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख 17/09/2021 *Time वेळ 23/25 वा

(c) General Diary Reference Entry No. (s) सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक 33/2021 *Time वेळ 23/25 वा

4. Type of information : माहितीचा प्रकार लोकसेवकाने लाच घेतल्या बाबत *Written / Oral : लेखी/तोंडी लेखी

5. Place of Occurrence : (a) * Direction and Distance from P.S. घटनेचे ठिकाण पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर मौजा आरमोरी वन उपअधिकारी कार्या. 1 Km पश्चिम Beat No. गस्तक्षेत्र क्र.

(b) *Address: पत्ता रा. आरमोरी ता. आरमोरी जि. गडचिरोली.

(c) In case outside limit of this Police Station, then the
या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव

Name of P.S. पोलीस ठाणे — Dist.: जिल्हा —

6. Complainant /Informant :
तक्रारदार / खबरी

(a) Name नाव संजय मंडल

(b) Father's/ Husband's Name पित्याचे / पतीचे नाव सुबल मंडल

(c) Date/Year of Birth : जन्म तारीख / वर्ष 43 (d) Nationality : राष्ट्रीयत्व भारतीय

(e) Passport No. : पारपत्र क्र. — Date of Issue : दिल्याची तारीख — Place of Issue दिल्याचे ठिकाण —

(f) Occupation : व्यवसाय शेती

(g) Address : पत्ता रा. देशबंधुग्राम. ता. मुलचेरा जि. गडचिरोली.

नक्कल फिर्याद

दिनांक १७/०९/२०२१

मी श्री संजय सुबल मंडल, वय ४३ वर्षे, जात–बंगाली, धंदा–मजूरी, रा. देशबंधुग्राम, पो., ता. मुलचेरा, जि. गडचिरोली मो.नं. ८०१०६५७५९६.

मी दिनांक १७/०९/२०२१ रोजी श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तकार नोंदविली. श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तकार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे.

दि. १५.०९.२०२१ रोजी मी व मौजा लोहारा येथील माझा मित्र दिपक गावडे यांचे घराचे वास्तु असल्याने येणाऱ्या पाहुण्यांकरीता मौजा तारसा येथुन देशी दारु आणीत असतांना आष्टी येथील पोलीसांनी आम्हाला पकडले व आम्हा दोघांवरही केस केली व नंतर श्री चव्हाण पोलीस यांनी ३०,०००/– रु दया तुम्हाला कोर्टात मदत करतो, नाहीतर तुझी गाडी सुध्दा जप्त करतो, असे म्हणाले म्हणुन मी माझ्या पत्नीला फोन करुन पैसे घेवुन ये म्हणुन सांगितले त्यामुळे तिच्या जवळील २०,०००/– रु. घेवुन पोलीस स्टेशन आष्टी येथे आली व श्री चव्हाण पोलीस यांना २०,०००/– रु दिले. तेव्हा मला व दिपक गावडे यांना सोडले व तुम्हाला तुमच्या केस मध्ये मदत करतो उर्वरीत १०,०००/– रु उदया घेवुन ये, नाहीतर तुझी सुध्दा गाडी जप्त करतो असे म्हणाले. त्यावर मी घाबरुन ठिक आहे साहेब आता आमच्याकडे पैसे नाहीत १०,०००/– रु. जमवुन दोन दिवसात आणुन देतो असे म्हणालो त्यावर त्यांनी ठिक आहे, लवकर पैसे घेवुन ये'' असे म्हणुन त्यांनी मला पैशाची मागणी केली आहे.

श्री चव्हाण पोलीस, पोलीस स्टेशन आष्टी यांनी माझ्या विरुध्द केलेल्या केस मध्ये गाडी जप्त न करण्याचे व केस मध्ये मदत करण्याचे कामाकरिता रू. १०,०००/– लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री चव्हाण पोलीस, पोलीस स्टेशन आष्टी यांना रु. १०,०००/– लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी माझे वैयक्तीक दैनंदीन बचतीतील रु. १०,०००/– सोबत घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तकार देण्यास आलो.''

श्री चव्हाण पोलीस, पोलीस स्टेशन आष्टी यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण–घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तकार देत आहे. मी सोबत आणलेले रु. १०,०००/– हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत.''

त्यानंतर श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी २ शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तकार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तकार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. १०,०००/– (रू. ५००/– दराच्या २० चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे कमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अ‍ॅन्थ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अ‍ॅन्थ्रॅसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री यशवंत राऊत यांनी पंचनामा कं. १ मध्ये घेतल्या आहेत.

दिनांक १७/०९/२०२१ रोजी श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक, मी, शासकीय पंच व स्टॉफ सह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथुन शासकिय वाहनाने रवाना होवुन मौजा आष्टी गावाचे जवळ पोहचुन आडोसा घेवून थांबून होतो. त्यानंतर श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच कं. १ यांचे आवाजाचा नमुना घेवुन माझ्या मोबाईल कं. ८०१०६५७५९६ वरुन श्री चव्हाण पोलीस यांचे मोबाईल कं. ७५८८७८०६९८ वर फोन करुन स्पिकर सुरु

**Form : 1-B**

Details of known/ suspected/ unknown accused with full particulars :
माहित असलेल्या/ संशयीत/ माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet, if necessary)
(आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा)

No. 0045167

आरोपी 1) श्री पंकज विठ्ठल चव्हाण वय ३२ वर्षे धंदा नौकरी पोशि/६०७३ वर्ग ३ 2) पंकज विलास राठोड वय ३२ वर्षे धंदा नौकरी पोना/5125 वर्ग ३ दोन्ही पोस्टे आष्टी ता. चामोर्शी जि. गडचिरोली

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex<br>लिंग | *Date/Year of Birth<br>जन्मतारीख/ वर्ष | *Build<br>बांधा | *Height in Cms.<br>उंची (से. मी. मध्ये) | *Complexion<br>वर्ण | *Identification Mark(s)<br>ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| — | — | — | — | — | — |

| *Deformities/Peculiarities<br>व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth<br>दात | *Hair<br>केस | *Eye<br>डोळे | *Habit(s)<br>सवयी | *Dress Habits<br>पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| — | — | — | — | — | — |

| * Languages/Dialect<br>भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark<br>भाजल्याची खूण | *Leucoderma<br>कोड | *Mole<br>तीळ | *Scar<br>व्रण | *Tattoo<br>गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| — | — | — | — | — | — |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
जर तक्रारदार/ खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.
A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.
A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.

करुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये पंच क्रं. १ यांचे समक्ष रेकॉर्ड करण्यात आले असता त्यांनी मला पंच क्रं. १ यांचे समक्ष माझ्याविरुध्द केलेल्या केस मध्ये गाडी जप्त न करण्याचे व केस मध्ये मदत करण्याचे कामाकरिता रू. १०,०००/— रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. ८,०००/— लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर पंच क्रं. १ यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

पोलीस निरीक्षक श्री राऊत यांनी पंच क्रं. १ व २ यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण लोकसेवक श्री चव्हाण पोलीस, पोलीस स्टेशन आष्टी यांनी माझ्या विरुध्द केलेल्या केस मध्ये गाडी जप्त न करण्याचे व केस मध्ये मदत करण्याचे कामाकरिता रू. १०,०००/— रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. ८,०००/— लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक श्री चव्हाण पोलीस यांचेविरूद्ध सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले.

मला पंचासमक्ष अ‍ॅन्थ्रेसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे फुलपॅन्टचे मागील डावे बाजुचे खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागी येवून डोक्याला बांधलेला दुपट्टा सोडुन खांदयावर ठेवावा असा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

पोलीस निरीक्षक श्री राऊत यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. १ यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. १ यांचेसह मौजा पोलीस स्टेशन आष्टी येथे गैरअर्जदार श्री चव्हाण पोलीस यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा—गटाने माझे मागोमाग आले. मी पोलीस स्टेशन आष्टी समोर जावुन गैरअर्जदार श्री चव्हाण पोलीस यांचे मोबाईलवर फोन करुन आल्याबाबत सांगितले असता त्यांनी नंतर फोन करुन चंद्रपुर कडे जाणाऱ्या रोड कडील वनउपज तपासणी नाक्यासमोर रोडचे बाजुस येण्यास सांगितले त्याप्रमाणे मी तेथे गेलो असता तेथे गैरअर्जदार व श्री राठोड पोलीस हे हजर मिळाले नाक्याजवळ पोहोचल्यावर श्री चव्हाण पोलीस यांनी लाचेची रक्कम मागीतल्याने मी अ‍ॅन्थ्रेसिन पावडर लावलेली रू. ८,०००/— लाचेची रक्कम माझे फुलपॅटच्या मागील डावे बाजुच्या खिश्यातुन काढुन श्री राठोड पोलीस यांना दिल्या असता, त्यांनी लाच रक्कम रू. ८,०००/— आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजून बसुन असलेल्या मोटार सायकलच्या टंकीवरील डिक्कीत ठेवले त्याचवेळी मी पंच क्रं. १ सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे डोक्यास बांधलेला दुप्पटा सोडुन खांदयावर ठेवुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने गैरअर्जदार श्री चव्हाण व श्री राठोड पोलीस यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री यशवंत राऊत यांनी पंचनामा क्रं. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक १) श्री पंकज विठ्ठल चव्हाण, वय ३२ वर्षे, धंदा— नौकरी, पोलीस शिपाई, ब. नं. ६०९३, २) श्री पंकज विलास राठोड, वय ३२ वर्ष, धंदा नौकरी पोलीस नाईक ब.नं. ५१२५, दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन आष्टी, जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझ्या विरुध्द केलेल्या केस मध्ये गाडी जप्त न करण्याचे व केस मध्ये मदत करण्याचे कामाकरिता रू. १०,०००/— लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. ८,०००/— लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

ठाणे अंमलदार
पो स्टे आष्टी

**Form : 1-C**

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/ खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

No. 0045167

पोस्टे ला तक्रार प्राप्त होताच

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा) :

—

—

—

10. *Total value of properties stolen/involved : —
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report/U. D. Case No., if any : —
मरणान्वेषण अहवाल/ यु. डी. प्रकरण क्र. जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required ):
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावेत) : घटना ता वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार यांचे विरुद्ध दाखल गुन्ह्यामध्ये गाडी नापास करण्याचे व केस मध्ये मदत करण्याचे कामी करीता आरोपी 1) पंकज विठ्ठल चव्हाण वय 32 वर्षे धंदा-नोकरी पोशि बन. 6093 वर्ग 3 पोस्टे आष्टी ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांनी 10,000 रु लाच रक्कमेची पंच साक्षीदार समक्ष सुस्पष्ट मागणी केली व आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थिक फायदा करीता काम व अवैध मार्गाने आरोपी क्र 2 श्री पंकज राठोड पोना यांचे मार्फतीने स्वतः व आरोपी क्र 2 यांचे साठी तक्रारदार यांचेकडून तडजोडी अंती रु 9,000 रु लाच रक्कम वनउपज तपासणी नाका चंद्रपूर रोड आष्टी येथे स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले नमुद कलमान्वये कार्यवाही सुरु आहे.

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2, registered the case and took up the investigation/directed*........................................ Rank........................................to take up the investigation/ Refused investigation/transferred to P. S........................................on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले ........................................ पदनाम ........................................ यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/ तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यावर ........................................ पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

F. I. R. read over to the Complainant/Informant /admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

x Samyog

Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रारदाराची/खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

Signature of the Office-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name : चंद्रप्रकाश मा निमसरकार
नाव

*Rank : पोहवा No. 2409
पदनाम क्रमांक

Date & Time of despatch to the court : 18/09/2021 चे 11/00 वा.
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ